# फिलिप्पैकरांस पत्र

**१**, **सर्व** देखरेख करणारे व सहकर्मी, पौल व तीमथ्य, जे येशूचे दास आहेत, या सर्वांकडून त्या पवित्र लोकांच्या नावांत
२,३ जे फिलिप्पैत राहतात, **आमच्या** स्वर्गिय पिता व स्वामी येशू याकडून तुम्हांस कृपा व शांति असो. **तुमची** आठवण आली
४,५ की मी आपल्या स्वर्गिय बापा ची उपकार स्तुति करातो. **तुमच्या** साठी मी नेहमी आनंदाने विनंती करतो. **आजपर्यंत**
६ शुभसंदेशात तुमची भागीदारी प्रारंभापासून लाभली आहे. **या गोष्टीची** निश्चयता मला आहे की ज्या परमेश्वराने
७ तुमच्यात एका चांगल्या कामाची सुरवात केली, ते तो येशूच्या दिवसापर्यंत पूर्ण करेल. **यास्तव** तुम्ही माझ्या हृदयात
वसलेले आहात, माझ्याकरता हे उत्तम आहे की, मी तुमच्या बद्दल असा विचार करावा; माझ्या बेडया व
शुभवर्तमानाची पुष्टी व ते वाचविण्याच्या उद्देशाने, यहोवा परमेश्वराच्या कृपेद्वारे तुम्ही सर्व माझ्या सोबत भागीदार
८,९ आहात. **येशू** ख्रिस्ताच्या स्नेहात मी तुमच्यावर किती प्रेम करतो त्याचे साक्षीदार स्वत: सृष्टिचे स्वामी आहेत. **मी** अशी

---

१:१ **''तीमथ्य''**- प्रेषित ११:१ तीमथ्याने या पत्राच्या लेखनात मदत केली नव्हती. कदाचित पौलाच्या सांगण्यावरून लिहीले असावे. रोम १६:२२ शी याची तुलना करा.

**''दास''** - रोम १:१

**''पवित्र लोक''** - रोम १:७

**''फिलिप्पै''** -प्रेषित १६:१२-४०

**''देखरेख करणारे''** प्रेषित २०:३८; १ तीमथ्य ३:३; १ पेत्र ५:२.

१:२,३ रोम १:७,८.

१:४ **''प्रत्येक प्रार्थनेत''** - रोम १:१०.

**''आनंद''**-साधारण रितीने पाहिले असता पौलाच्या दु:खाचे कारण, तेथील मंडळया होत्या. १ करिंथ किंवा गलतीकरांस पत्रात पौलाच्या आनंदाचा विषय काहीच नव्हता. त्या सर्व मंडळयांच्या तुलनेत फिलिप्पै येथील मंडळी भिन्न होती. फिलिप्पैच्या मंडळीत -**''आनंदाचा''** एक विशेष विषय होता. पौलाच्या इतर पत्रांच्या तुलनेत, ''आनंद'' हा शब्द या पत्रात जास्त वापरला गेला आहे. १:१८,२५-२६; २:२,१७,१८,२८; ३:१;४:१,४,१०.

१:५ येथे पौलाच्या उपकारस्तुति व आनंदाचे कारण आहे. ज्या भागीदारीची व मदतीचा अनुभव त्यानी तेथे घेतला होता त्यात कोणतीहि बाधा आलेली नव्हती. ४:१४-१६. येशूच्या शुभवर्तमानाने, त्यांची कृती व हृदय एक केले.

**''शुभवर्तमान''** १ करिंथ १५:१-८ यात पौल शुभवर्तमानाची व्याख्या देतो. रोमकरांस पत्र या बद्दल खुलासा करते.

१:६ **''निश्चयता''** २ करिंथ १:१४,१५; गलती ५:१०; १थेस्सलनी १:४,५; इब्री ६:९-१०.

**''ज्याने सुरवात केली''** - परमेश्वर आपण या वचनात खालील गोष्टी शिकतो: खरे विश्वासू परमेश्वराचे कार्य आहेत. इफि २:१०;२करिंथ ५:१७. परमेश्वरच त्यांच्या जीवनात मुक्तिचे कार्य सुरू करतात. याकोब १:१८; योहान ३:५-८; ६:३६,४४. या कार्याला परमेश्वरच पुढे चालू ठेवतात- २:१३; १ करिंथ १२:६; कलस्सै १:२९; इब्री १३:२१.

हे एक ''उत्तम'' कार्य आहे. हे अंत:करणतील कार्य होय (तुमच्या आत) असे कार्य जे आत्मा, मन व हृदयाच्या आत होते. २:१३; गलती २:२०; इफिस ३:१६-२० हे कार्य परमेश्वर पूर्ण करतात- रोम ८:२९-३०. काही कारणांनी लोक, प्रारंभिलेले कार्य तसेचसोडून देतात, परंतु परमेश्वर असे करत नाहीत. एखादयाच्या जीवनात मुक्तिचे कार्य आरंभ केल्यावर, परमेश्वर ते समाप्त करू इच्छितात व संपवतात देखील. पौलाला या विषयी खात्री होती, आपल्याला देखील अशी खात्री असावी. २:१२,१३ यानुसार या कार्यात आपण परमेश्वराला सहकार्य केले पाहिजे. नोट्स पहा.

''येशूचा दिवस'' म्हणजे येशूचे दूसरे आगमन.

१:७ **''माझ्या आत्म्यात किवा माझ्या हृदयात''**- २ करिंथ ३:२; ६:११; ७:३.

**''बेडया''**-वचन १३, इफिस ४:१; ६:२०.

**''वाचविणे-रक्षण करणे''**-परमेश्वराच्या दासांनी आक्रमण, आरोप व चुकीच्या समजुतीपासुन शुभवर्तमानाचे रक्षण केले पाहिजे.

**''दया''**-योहान १:१४ आणि रोम १:७ ची टीप पहा. परमेश्वराच्या दयेने त्यांना येशूचे विश्वासू बनवले, व याद्वारे येशूच्या खऱ्या मंडळीत त्यांना सामिल केले.

१:८ येशू पौलाच्या जीवनात होते. पौलाचे प्रेम त्याच्याद्वारे जणू येशूचे प्रेम होते. गलती २:२० जो पर्यंत आपण येशू सारखे प्रेम करणे शिकत नाही तो पर्यंत त्यांच्यासारखे प्रेम करूच शकणार नाही. इफि -३:१७-१९. जे विश्वासू येशूच्या आज्ञेनुसार जीवन जगतात, त्यांच्यासाठी प्रेम, परमेश्वराच्या आत्म्याचा एक परिणाम होय. गलती ५:२२.

**''इच्छितो''** येथे पौल अशा हृदयाविषयी सांगतो जो प्रत्येक ख्रिस्ती कार्यकर्त्याच्या ठायी असावे. ४:१; रोम १:१; २ करिंथ २:४; गलती ४:१९-२०; १ थेस्स २:१७; २ तीमथ्य १:४.

१:९-११ इफिसकरांसाठी पौलाने केलेल्या प्रार्थनेशी तुलना करा- १:१७-१९; ३:१६-१९ आणि कलस्सै १:९-१२.

पौलाची विनंती परमेश्वर-आत्मा प्रेरित आहे, ती आम्हांला शिकवण्यासाठी आहे. याद्वारे आमच्याहृदयात व आमच्यासाठी परमेश्वर काय करू इच्छितात, हे शिकू शकतो. यावरून दूसऱ्यांसाठी प्रार्थना कशी करावी हे शिकावयास मिळते.

१:९ **''तुमचे प्रेम''** - परमेश्वराने येथे इशारा केला आहे की विश्वासू व मानवजाति बद्दल वाढावे असे देवबापाला वाटते, खरे प्रेम कसे असते, ते कसे प्रगट केले जाऊ शकते या गोष्टी विश्वासू लोकांनी अधिक मोठया प्रमाणावर ओळखाव्यात. हे प्रेम आंधळे नसावे परंतु या ऐवजी येशूच्या ज्ञानात व स्नेहात भरभरून असलेले व्हावे. इफि ३:१७-१९.

१० प्रार्थना करतो की तुमचे प्रेम, ज्ञान व समंजसपणा जास्त ओसंडावा:भरून वाहावा **तुम्ही** येशूच्या दूसऱ्या आगमनापर्यंत
प्रामाण्कि रहा व सुवार्तेला अडथळा आणणारे बनू नका यासाठी की ज्या सर्वोत्तम आहेत त्या गोष्टी खऱ्या प्रमाणित
११ कराव्या. **येशू** द्वारे प्राप्त होणाऱ्या धार्मिकतेच्या फळांनी भरून जा, ज्याद्वारे यहोवा परमेश्वराची स्तुति व प्रशंसा केली
१२ जाते. **बंधुनो-भगिनींनो,** माझी इच्छा आहे की तुम्ही याबद्दल जाणावे की जे काही माझ्या जीवनात घडले त्या सर्वांद्वारे
१३ शुभवर्तमानाची प्रगति झाली. **याचा** परिणाम असा झाला की राजमहालातील सुरक्षा दलात व इतर ठिकाणी असे प्रसिद्ध
१४ झाले की मी येशूकरता बंदिवान झालो आहे. **माझी** बंदी अवस्था पाहून कितीतरी ख्रिस्ती भाऊ-बहिण निर्भयपणे व
१५ धाडसाने शुभसंदेश सांगत आहेत. **काही** लोक हेव्याने प्रेरित होऊन सुवार्ता सांगतात परंतु त्यांच्यात सद्भावना आहे.
१६ **जे** लोक हेवा करतात त्यांची मने स्वार्थाने भरलेली आहेत.ते प्रामाण्किपणे असे करत नाहीत. माझ्या दु:खाना ते आणखी
१७ वाढवू इच्छितात. **परंतु** चांगल्या मनाने संदेश देणारे प्रेमाने भरून हे कार्य करतात हे जाणून की मी शुभवर्तमानाच्या
१८ पक्षात आहे. **तर** मग याचा परिणाम काय होतो? केवळ हाच की सर्वप्रकारे, निमित्ताने असो किंवा खरे पणाने, येशूच्या
१९ विषयी सांगितले जाते. त्यातच मी आनंदित आहे व असणारच. **करण** की हे जाणतो की तुमच्या प्रार्थनेने व येशूच्या
२० आत्म्याने मला स्वतंत्रता मिळेल माझी सुटका होईल. **नेहमीप्रमाणे** आज देखील पूर्ण खात्रीने मी असे म्हणू शकतो की

---

१:१० "जे सर्वोत्तम त्यास सहमति देऊ शकणे" विश्वासू या नात्याने एका मंडळीत त्यांचे जीवन कसे असावे या बाबत तो सांगतो या चांगल्या बाबीं विषयी तो २:१-५; १४,१५; ४:८,९ यात काही सांगतो.

१:११ "फळे" - मत्तय ७:१७; रोम ६:२२,७:४ गलती ५:२२; इफि ५:९.
"धार्मिकतेची" -इब्री १२:११; याकोब ३:१-८. तो बदल जो स्वर्गिय पित्याशी संबंध झाल्या नंतर होतो.
"येशूच्याद्वारे" - केवळ येशू द्वारेच परमेश्वर काही स्विकार करतात (योहान १:४,५)
"यहोवाच्या स्तुति प्रशंसेसाठी" - इफि १:६,१२,१४.

१:१२ त्याला अटक करून तुरूंगात घातले गेले. पण यामुळे तो निराश होऊन कुरकुर करत नव्हता. उत्पत्ति ५०:२० शी तुलना करा. रोम ८:२८ यात त्याने तोच विश्वास ठेवला जो यात लिहीलेला आहे.
"प्रगति" ज्या गोष्टींना लोक सुवार्तेकरता अडथळा समजतात त्याच गोष्टी त्याच्या प्रचारात मदत करणाऱ्या सिद्ध होतात. प्रगट होणाऱ्या दुर्घटना आशिर्वाद बनू शकतात. विश्वासूच्या जीवनातील सर्व घटना -परमेश्वराच्या हातात असल्यामुळे, एखादे चांगले लक्ष्य साधले जाऊ शकते.

१:१३ जे पहारेकरी पौलाचा पहारा देत होते त्यांना पौलाने सुवार्ता सांगितली हे पहारेकरी रोमी राजा किंवा गवर्नरच्या सेवेतील असावेत. (हि ठाऊक नाही की हे पत्र लिहिताना पौल कोण्त्या तुरूंगात होतो) म्हणून शुभवर्तमान पूर्वी ज्या ठिकाणी पोहोचले नव्हते तेथेहि ते पसरत गेले. २ तीमथ्य २:९ शी तुलना करा.
"मी ख्रिस्तासाठी बंदिवान आहे" सर्व लोकांना माहित होते की पौल अपराधी नव्हता. त्याने कायदा मोडला नव्हता पण सुवार्ता प्रसार करणे हाच त्याचा अपराध होता.

१:१४ ज्या पहारेकऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी त्याला बंदी बनवले होते त्यांना सुवार्ता सांगणे धाडसाचे कार्य होते. हे धाडस पाहिल्यावर विश्वासणाऱ्या लोकांचा निर्भयपणा आणखी वाढला याचा परिणाम असा झाला की शुभवर्तमान अधिक जोराने व मोठ्या प्रमाणावर पसरत गेले.

१:१५-१७ त्याकाळी जे सुवार्ता सांगणरे होते, त्यापैकी सारेच चांगल्या मनाने हे कार्य करत नव्हते. काही लोक पौलाचे सुनाम व प्रसिद्धी पाहून त्याचा हेवा करत होते. त्याला आपला प्रतिद्वंदी (शत्रू) समजत होते. त्यांची सेवा स्वार्थ -प्रेरित होती. आज देखील स्थिती तशीच आहे. काही दास, प्रसिद्ध होऊ इच्छितात, त्यांना यश हवे. दूसऱ्या दासांचा अनादर करून त्यांच्यासाठी समस्या उत्पन्न करता आल्यात तर तसेही करण्यात मागे राहत नाहीत. पण पूर्वीसारखे आज देखील आहे. ते म्हणजे अजूनहि लोक येशूच्या व लोकांच्या प्रेमाखातर शुभवर्तमान पसरवतात.

१:१८ पौलाने कधीहि कोणालाहि आपला प्रतिद्वंदी मानले नाही. त्याची अशी कामना होती की येशू व त्यांचा संदेश सर्व ठिकाणी पसरावा. जे त्याला पसंत करत नव्हते ते त्याच्या करता समस्या निर्माण करायचे, परंतु सुवार्ता देखील सांगायचे. अशा लोकांसाठी पौल आनंदित होता. तो प्रसिद्ध होऊ इच्छित नव्हता पण केवळ येशूचे नांव उंच करू पाहत होता. येथे सर्वांसाठी एक शिकवण आहे. जे येशू संबंधित वचन देत होते त्यांच्याकडे पौलाचा इशारा आहे, त्या लोकांसाठी नव्हे ज्यांविषयी तो सावध करतो. (२ करिंथ ११:१३-१५; गलती १:७-८ इत्यादि)

१:१९ कदाचित पौल त्याच्या विरोधापासून मुक्तिविषयी आणि त्याचप्रमाणे मृत्यूपासून स्वतंत्रते विषयी बोलतो आहे; असे म्हणू शकतो. वचन २५,२६.
"तुमच्या प्रार्थना" - फिले २२; रोम १५:३०-३२.
"येशू ख्रिस्ताचा आत्मा"- रोम ८:९ व नोट्स पहा.

१:२० पौल निश्चिंत होता कारण कोणत्याहि परिस्थितित कोणत्याहि वेळी तो येशूविषयी धाडसाने बोलण्यात घाबरणार नव्हता. इफि ६:१९,२० शी तुलना करा.

२१ मी जगू अथवा मरू, माझ्या जीवनाद्वारे येशूस आदर सन्मान मिळेल. **कारण** माझ्यासाठी जगणे हे ख्रिस्त व मरणे लाभ
आहे. जर शरीरात जगलो तर याचा अर्थ माझ्या कामाचे फळ आहे, परंतु मला कळत नाही की मी कशाची निवड
२३ करू. **मी** या दोहोंच्या पेचात पडलो आहे, माझी आंतरिक इच्छा आहे की येशू जवळ राहण्यास येथून निघून जाऊ
२४,२५**कारण** हे अधिक चांगले आहे. परंतु मी दैहिक रितीने जिवंत असणे तुमच्यासाठी जास्त लाभाचे आहे. **या** गोष्टींची
२६ खात्री.झाल्यामुळे तुमची उन्नति व विश्वासातील आनंदामुळे मी तुमच्यासोबत राहणार हे मला ठाऊक आहे. **अशासाठी**
२७ की माझ्याकरता तुम्ही आनंद करणे, माझ्या तुमच्याकडे येण्यापेक्षा अधिक व्हावा. **यासाठी** की मी येऊन तुम्हाला पाहिले
नाही तरी केवळ तुमचे वागणे येशूच्या शुभवर्तमानास शोभणारे असावे. मी एवढे ऐकाने की तुम्ही एकाच आत्म्यात
२८ स्थिरावलेले, एकजिवाने व एकचित्ताने शुभसंदेशच्या विश्वासासाठी भरपूर प्रयत्न करता आहात. **तुम्ही** विरोध
२९ करणाऱ्यांना घाबरत नाही.**हे** त्यांच्या विनाशाचे त्यांच्यासाठी सबळ चिन्ह आहे; पण तुमच्या साठी सृष्टिच्या स्वामीच्या
मुक्ति करता होय. हे येशूच्या मोबदल्यात तुम्हाला दिले गेले आहे. यासाठी की तुम्ही केवळ विश्वासच ठेवू नये पण
३० त्यांच्याकरता कष्ट देखील सोसावेत. **तुम्ही** जे पाहिले व ऐकले, त्याच युद्धासाठी स्वत:ला तयार करा. **म्हणून** जर

---

''येशूची स्तुति'' गलती १:१६ मध्ये पौलाने म्हटल्या प्रमाणे त्याच्या जीवनाचा व सेवेचा हा परिणाम उद्देश व तिच अपेक्षा आहे. जीवन किंवा मृत्यूत कसल्याहि दशेत यापेक्षा मोठा दूसरा उद्देश होऊ शकत नाही. केवळ विचार व इच्छेतूनच नव्हे तर पौलाच्या जीवनातून व व्यवहारातूनहि येशूस सन्मान मिळत होता.

१:२१ ''जगणे हे ख्रिस्त''-गल २:२० स्वत:च्या शक्तिने नव्हे तर पौलाच्या आत जे ख्रिस्ती जीवन होते त्याद्वारे तो जिवंत होता. येशूच्या शक्तिने तो जगत होता. स्वत:स नव्हे तर येशूस आदर देत होता.

''मरणे लाभांचे'' -पौलाला मृत्यूचे भय नव्हते. (इब्री २:१५ पहा) तो स्तोत्र ११६:१५ ची सत्यता जाणत होता व मरणा द्वारे येशूचा सनमान होईल. वचन २० परंतु वचन २३ प्रमाणे, येशू जवळ जाण्याचा आनंद देखील मिळणाऱ्या लाभाचा एक भाग होतो. प्रत्येक व्यक्ति असे म्हणू शकेल काय, की मरणे त्याच्यासाठी लाभाचे आहे. नाही, केवळ जे येशूसाठी जगतात तेच असे म्हणू शकतात. जे लोक स्वत:साठी जगतात त्यांच्यासाठी मरणे फायदयांचे होऊ शकत नाही. जे लोक येशूस ओळखत नाही, त्यांच्यासाठी मृत्यू एक शत्रू होय.

१:२२-२४ ''माझ्या श्रमाचे फळ'' - रोम १:१३, ७:४ पौलाच्या विश्वासावर लक्ष दया. त्याला माहित होते की त्याचे परिश्रम यशस्वी होतील हे यामुळे शक्य झाले कारण तो समजत होता की येशूमुळेच त्याच्या जीवनात हे कार्य चालले आहे. कलस्सै १:२९.

''कशाची निवड करू'' -मरणे, जगणे, दोन्हींचा त्याने स्विकार केला होता. कोणती गोष्ट निवडू हे त्याला कळत नव्हते.

''येशू सोबत'' २ करिंथ ५:८; लूक २३:४३. विश्वासू मेल्यानंतर येशूच्या उपस्थिति पोचतो.

१:२५ ''स्थिर राहू'' पौल मेल्यानंतर येशू जवळ जाण्याची इच्छा ठेवत होता. तरी देखील त्याची स्वत:ची पसंत विशेष महत्वाची नव्हती. त्याचे कार्य व प्रार्थना दूसऱ्यांच्या गरजेवर आधारित होती. तुलना करा. १ करिंथ ९:१९-२३; १०:२४,३३. पौलाला कसे माहित झाले की तो त्या वेळी मरणार नाही? परमेश्वराने त्याला आश्वासन दिले होते की त्यांच्या मुक्तिची विनंती मान्य केली जाईल, त्याचे उत्तर मिळेल. वचन १९; २:२४.

''उन्नति व विश्वासातील आनंद'' इफि ४:१२,१३. विश्वासातील उन्नति बरोबर आनंद देखील कायम राहील. प्रत्येक विश्वासूने स्वत:च्या जागिक उन्नतिपेक्षा अधिक, येशूच्या विश्वासाची उन्नति जास्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१:२६ ''योग्य'' इफि ४:१; कलस्सै १:१०; १थेस्स २:१२.

''स्थिर राहून'' इफि ६:११,१४.

''एक आत्मा.......एक मन'' -२:२; इफि ४:२; १ करिंथ १:१०; रोम १२:१६.

''प्रयत्न'' वचन ७; यहूदा १. जेव्हा शुभ वर्तमानावर आक्रमण होते तेव्हा. येशूच्या लोकांनी खोटे शिक्षण व चुका यांच्याशी कुठलाहि समझोता करू नये. सुवार्तेच्या सत्यतेकरता संघर्ष करणे चांगले आहे. स्वर्गिय पित्याकडून प्राप्त होणारी बुद्धिमत्ता, आत्मिक बळ, पूर्ण योग्यता व प्रेम यांच्या मदतीने आपण हे कार्य करावे.

१:२८ ''घाबरत नाही'' वचन १४,२०; मत्तय १०:२८; इब्री १३:६.

''विरोध करणारे'' वचन ३०

''चिन्ह'' विश्वासू लोकांचे येशूत साहस हे प्रमाणित करत होते. की परमेश्वर बाप त्यांच्या सोबत होते. प्रेषित ४:१३; २थेस्स १:४-७. त्यांचे विरोधक जाणू शकत होते की येशूच्या विश्वासू लोकांबरोबर परमेश्वर आहेत. स्वत: जे विरोधक होते त्यांच्या सोबत परमेश्वर नाहीत हे त्यांना माहित होते.

१:२९ ''दिले गेले विश्वास ठेवा'' विश्वास परमेश्वराचे एक दान होय. उत्पत्ति २:८. पृथ्वीवरचे एक दान होय. उत्पत्ति २:८. पृथ्वीवर राहून ते जाणणे फार मोठी गोष्ट आहे. पहा ३:१०; प्रेषित ५:४१; रोम ५:३; २ करिंथ १:५; १पेत्र ५:१३, १४,१६.

''दु:ख भोगणे-सहन करणे''- एक आशिर्वाद होय. येशू करता दु:ख सहन करणे, ही आदराची गोष्ट नव्हे का ? प्रेमाचे उत्तर होय असणार. येशू खातर येणाऱ्या समस्यापासून बचाव करण्याचा कोणताहि प्रयत्न प्रेम करत नाही.

१:३० ''माझ्यात'' पौलासमोर असणाऱ्या समस्या पाहण्यासाठी पहा प्रेषित १६:१९-४०; या ठिकाणी सुवार्तेचे शत्रू होते, त्यांच्या तर्फे विरोध होत होता.

२,२ येशूच्या ठायी काही आवश्वासन, प्रीतीचे सांत्वन, पवित्र आत्म्याची भागीदारी, काही कळकळ व दया आहेत. **तर** एकच
३ लक्ष्य ठेवून प्रेमात एकजीव हाऊन एकमेकांसाठी एकतेची भावना ठेवा. **आपल्या** नावाच्या स्वार्थासाठी नव्हे तर
४ मनाच्या लीनतेने प्रत्येकाने दूसऱ्यास स्वत:पेक्षा उत्तम समजावे. **प्रत्येकाने** स्वत:च्या लाभाचा विचार न करता
५,६ दूसऱ्याच्या फायदयाकडे लक्ष दयावे. **जे** येशूच्या ठायी होते. तेच मन तुमच्यात असावे. **जरी** आरंभापासून येशू जवळ
यहोवा परमेश्वराचा स्वभाव होता तरी जिला सहसा सोडता येणार नाही अशी समानता परमेश्वर यहोवा बरोबर
७ आपल्या लाभाची मानली नाही. **परंतु** येशूने ही समानता बाजूला टाकून, दुसऱ्या मनुष्यासारखाच मनुष्य बनून एका

---

२:१,२ विश्वासू लोकांच्या आपसातील संबंधामुळे पौलाला दु:ख होत होते. १:२७; ४:२ विश्वासू होण्याच्या नात्याने त्यांच्या जवळ जे काही होते त्याच्या आधारावर पौल त्यांना विनंती करतो.

"जर"तो या साठी संदेह करत नाही की त्यांच्यात त्या गोष्टी होत्या ज्या तो त्यांना तेंव्हा सांगत होता. तात्पर्य हे होय, की २:३ तुमच्यात यां गोष्टी आहेत योहान १७:२०-२३; रोम ६:५; इफि ४:१५,१६.

"शांति" २ करिंथ १:३,५,६.

"भागीदारी-सहभागिता" २ करिंथ १३:१४.

"कोमल भावना आणि दया" प्रत्येक विश्वासूत दुसऱ्यांकरता हे गुण असावेत.

२:३ "भावना" - १:१७; यिर्मया ४५:५; १करिंथ १३:१४; गलती ५:२०.

"दुसऱ्यांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना" रोम १२:१०,१६; गलती ५:२६; १पेत्र ५:५,६; पौलात याचा आदर्श पहा- इफि ३:८; १ तीमथ्य १:१५.

२:४ रोम १४:१९; ५:२१; १करिंथ १०:२४.

२:५-११ पौल विश्वासू लोकांसमक्ष दुसऱ्यांच्या प्रति नम्रतेचे व प्रेमाचे सर्वात मोठे उदाहरण मांडतो. येशूची पद्धत व त्यांचे कार्य जसे होते, तसेच आपले असणे शक्य आहे का? होय, हे शक्य आहे. म्हणूनच पौल या विषयी सांगतो कारण ते शक्य नसते तर पौलाने तसे म्हटले हि नसते. वचन ५; १ करिंथ २:१६; रोम ८:५ देखील पहा. येशू आपल्या लोकांच्या अंत:करणात असून ते त्यांच्या हृदयाचे स्वामी आहेत. विश्वासू लोकांना आवश्यक असणाऱ्या गोष्टी व विचार, येशू त्यांना देऊ शकतात. इफि ३:१७) हे शक्य झाल्यावर भांडण, स्वार्थ, धोका व क्रोध समाप्त होऊन जातात.

नवा करार याविषयी शिकवतो. त्याचा सारांश पौल या वचनात देतो. दररोजच्या जीवनाशी त्याचा संबंध दाखवतो. या गोष्टी लोकांनी लागू करण्यात अशी पौलाची इच्छा आहे. स्वर्गिय पित्याची महिमा व वैभव त्यागून येशू या पृथ्वीवर आलेत, त्यांनी सेवेचे जीवन व्यतित केले. जगातील खोटया वैभवाकडे व संपत्ती कडे दुर्लक्ष करून सर्वांनी परमेश्वर व लोकांची सेवा लीनतेने करावी.

२:६ "परमेश्वरासोबत समानता" ग्रीक भाषेत येथे एकच अर्थ होऊ शकतो. येशूचा स्वभाव परमेश्वराच्या स्वभावासारखाच होता. बायबल मध्ये इतर ठिकाणी येशूला परमेश्वर म्हटले गेले आहे. यशय ९:६; योहान १:१,२०,२८,२९; प्रेषित २०:२८; रोम ९:५; तीताला २:१३; इब्री १:८; १योहान ५:२०. या व्यतिरिक्त आणखी काही ठिकाणी येशूला परमेश्वर म्हटले गेले आहे. पहा मत्तय १:२३; २:११; ३:१७;१०:३७; ११:२७;१२:८; १४:२३; १८:२०;२२:४१-४५; २६:१७,१९,२०; योहान ५:१७-२६; ८:१९; ९:३८;१०:३०;११:२५;१४:७,१०,२,३;१७:१-५; प्रषित ३:१४,१५; रोम १:७; ८:९,१०; १करिंथ ८:६; २करिंथ ४:४; प्रेषित १३:१४; इफि ३:१७-१९; कलस्सै १:१५; २:९; १थेस्सलनी १:१; १ तीमथ्य १:१; ३:१६; इब्री १:३,१०,१२; १ पेत्र ३:१५; १ योहान १:३; २:२२; प्रगटी १:४,५,८; (२२:१२,१३ सोबत) १:१७,५:८; १३:१४; १९:१६;२१:६ इतर वचन दर्शवतात की यहोवाच्या देहात येशू आहे (जुण्या करारात परमेश्वराचे नांव) वचन १०,११ आणि लूक २:११ तील दुसरी वचने पहा.

"परमेश्वरा सोबत समानता" -येथे "लूटणे" ग्रीक शब्द काबीज करणे" किंवा "बल प्रयोग केलेले" च्या कडे इशारा करतो; याचा अर्थ एखादया वस्तुला आपल्या नियंत्रणात घेणे. शाब्दिक अर्थ असा असला तरी त्याचा अर्थ काहीसा असा असू शकेल.

स्वभाव व गुण यात परमेश्वर पिता, परमेश्वर पुत्र आणि परमेश्वर पवित्र आत्मा समान आहेत. हे असे आहे की ज्याला कोणीहि बळजबरीने होऊ शकत नाही किंवा सोडू शकत नाही. या अर्थाने येशूचे स्वत:ला परमेश्वराच्या समानतेचे समजणे म्हणजे, डाका घालणे किंवा लूटणे नव्हे. पदाच्या दृष्टिने त्रिएकत्वाचे जे तीन सदस्य आहेत त्यांच्यात समानता नाही. पित्याचे स्थान वरचे आहे. योहान ५:१९-२३; १४:२८; १करिंथ १५:२७,२८ पहा. परमेश्वर पुत्राने परमेश्वर पित्याच्या समानतेवर ताबा घेण्याची इच्छा केली नाही. त्यांचा आनंत यातच होता की पित्याने आपल्या स्थानी रहावे व पुत्राने पित्याची आज्ञा पाळावी. वचन ८; योहान ४:३४; ५:३०; ६:३८; ८:२९; ९:४; १४:३१; १५:१०; १७:४. या पृथ्वीवर पुत्र येण्यापूर्वी पिता व पुत्र यांच्यात जो फरक होतो तो स्पष्टपणे वरील वचनात आढळतो.

२:७ "आपली सर्व महानता बाजूला सारून" येथे ग्रीक भाषेत वेगवेगळा अनुवाद केला आहे. उदा. 'रिक्त केले' किंवा शून्य केले. परंतु याचा खरा अर्थ लावणे गरजेचे आहे. येशूने स्वत:ला ईश्वरत्वापासून रिकामे केले नव्हते असे होऊच शकत नव्हते. याच पृथ्वीवरच्या जीवनात येशू परमेश्वर देखील होते. त्यांनी स्वता:ला मात्र त्या महिमेपासून" रिक्त केले, जी परमेश्वरासोबत त्यांची होती. (योहान १७:५) त्यांनी परमेश्वराचा पुत्र होण्याच्या नात्याने आपल्या हक्क सोडून दिला होता. त्यांनी स्वर्गिय घरासोबत जे काही होते त्या सर्वांचा त्याग केला होता. २ करिंथ ८:९. जेथे लोकांच्या दृष्टिने कोणतेहि विशिष्ट स्थान प्राप्त करण्याची त्यांची मनसा नव्हती अशा ठिकाणी त्यांनी स्वत:ला ठेवले. ज्यांनी स्वांची रचना केली ते स्वत: अपमानित व लज्जित होण्यासाठी तयार झाले. योहान १:१०,११; यशया ५३:३; मत्तय ८:२०; १२:२४; मार्क ६:३; योहान १८:३०.

८ दासाचे मजूराचे स्थान ग्रहण केले. **पूर्ण** मानव रूप धारण करून, स्वत:स इतके लीन केले की मृत्यु करता तयार झाले,
९ तेहि वधस्तंभावरचे मरण सहन केले; **म्हणून** यहोवा परमेश्वराने येशूला अति उच्च केले आणि एक नांव दिले जे सर्व
१० नावांपेक्षा अतिउंच आहे. **यासाठी** की प्रत्येक गुडघा, मग तो स्वर्गात, पृथ्वीवर किंवा पृथ्वीच्या खालील लोकांचा असो,
११ येशूच्या नावात टेकला जावा. **स्वर्गिय** पित्याच्या सन्मानार्थ व गौरवासाठी प्रत्येक व्यक्तिने कबूल करावे की येशू
१२ ख्रिस्त हाच प्रभु आहे. **म्हणून** माझ्या प्रियांनो तुम्ही नेहमी माझ्या गोष्टी मान्य केल्या आहेत. माझ्या उपस्थितितच नव्हे

---

"आपली सर्व महानता बाजूला ठेवून" या द्वारे अधिकार व शक्तिच्या उंच स्थानावरून एक पायरी खाली उतरून, मनुष्यांच्या मध्ये येणे स्पष्टपणे दर्शविते.

"दास-मजूर"-रोम १५:८; योहान १३:३-५; लूक २२:२७; मत्तय २०:२८.

"च्या सारखे" - योहान १:१४; रोम ८:३; इब्री २:१४.

वास्तविक मानवीय स्वभावात येशू परमेश्वर आणि मानव दोन्ही आहेत. येशू परमेश्वर असून वास्तविक मानवीय स्वभावाचे होते.

२:८ "रूप" बाहेरून येशू केवळा एक मानव वाटत होते. त्यांचा ईश्वरीय स्वभाव व महानता जी या पृथ्वीवर येण्यापूर्वी होती ती लोकांच्या दृष्टित लपलेली होती.

"स्वत:ला लीन केले"-संपूर्ण जीवन हे एक सत्यच होते. (मत्तय ११:२९) परंतु जेव्हा त्यांचे मरण जवळ आले त्यावेळी त्यांची लीनता स्पष्टपणे पाहता आली. यशया ५३:७,८; १पेत्र २:२३,२४. परमेश्वराच्या पुत्राच्या रूपात येशूंनी आपल्या अधिकारांवर भर दिला नाही. ज्या लोकांनी त्यांच्यावर आरोप लावले.अपमानित केले व मारून टाकले, त्यांचा त्यांनी विरोध केला नाही.

"तयार" याचा अर्थ आहे पित्याच्या प्रति आज्ञाधारक होणे. मत्तय २६:२९; योहान१८:११ रोम ५:१९; इब्री १०:७; योहान १०:१७,१८. मरण. रोमी लोक अपराध्यांना वधस्तंभावरची मृत्यु शिक्षेच्या स्वरूपात देत असत; ही त्यांची पद्धत होती.

२:९ "यास्तव -म्हणून" परमेश्वराने त्याग, लीनता व आज्ञापालना बद्दल येशूला बक्षीस सुद्धा दिले. हे येशूच्या शिकवणुकीनुसार होते. मत्तय २३:१२.

"अति उंच केले" प्रेषित २:३३; इफि १:२०,२१; इब्री १:३; प्रगटी ३:२१. येशूने स्वत:ला जितके नम्र केले तितके कधीहि कोणीहि केले नाही. त्यामुळे कोणी इतक्या उंचावर चढू शकला नाही. येशूची योग्यता सिद्ध असल्यामुळे त्यांच्याजवळ सर्वात उंच स्थान होते.

"नांव" सर्वात उंच नाव 'येशू" वचन १०,किंवा 'प्रेम" (वचन ११) काय आहे? अपमानित केले जाण्यापूर्वी, मृत्युपूर्वी व सन्मानित होण्यापूर्वी "यशू" हे नांव दिले गेले होते, कदाचित पौलांचा "प्रभु" या शब्दाचा अर्थ हाच असावा. पौल त्या "प्रभु" या शब्दाचा अर्थ होच असावा. पौल त्या "प्रभु" कडे इशारा करू इच्छितो, जे येशूच्या मरणानंतर, जिवंत झाल्यावर स्वर्गात चढल्यावर व सन्मानित झाल्यावर दिले गेले होते. प्रेषित २:३६ शी तुलना करा.

"नांव" अधिकार प्रदर्शित करू शकते. योहान १४:१३,१४ पहा. याचा उपयोग "शिर्षका" सारखा देखील केला जाऊ शकतो. यशया ९:६; २:१०,११.

"प्रभु" ग्रीक शब्द "प्रभु" करता "कुरियोस" हा आहे. जुण्या करारात परमेश्वरासाठी वापरलेले नाव आहे. (लूक २:११) व निर्गम ३:१४,१५ पहा. त्यांच्या पुढे गुडघे टेकले जावेत - यशया ४५:२२-२४; मत्तय ४:१०. परमेश्वर बापाने येशूस हे नाव दिले आहे. परमेश्वराने पूर्ण सृष्टित या गोष्टीची घोषणा केली. आहे. की येशू जे मानव बनले, मृत्यूदंड सहन केला, तेच सृष्टिचे स्वामी आहेत. येशू महान परमेश्वर यहोवाच आहेत. ज्यांनी मानव रूप धारण केले. (प्रेषित २:३६; १करिंथ ८:६; मत्तय २८:१८) येशू स्तुति आराधना योग्य आहेत. इतर वचनपहा ज्यातून येशू यहोवाच आहेत हे दिसते. (लूक २:११)

"कुबूल करावे" वर्तमान काळी प्रत्येक विश्वासू आनंदाने मान्य करू शकतो की स्वर्ग आणि पृथ्वी वरील सर्व अधिकारांसह येशू सर्वशक्तिमान स्वामी आहेत. जाणून किंवा न जाणता, सर्वांना मान्य करावेच लागणार.

"स्वगिय पित्याचा सन्मान" येशूस सन्मान देऊन जर त्याचा प्रभु म्हणून स्विकार केला तर त्याद्वारे पित्यास आदर प्राप्त होतो. योहान ५:२३; १ योहान २:२३ शी तुलना करा.

२:१२ "यासाठी की" वरील गोष्टींचया प्रकाशात.

"मान्य करत आलात" याचा अर्थ होता की त्यांनी परमेश्वरद्वारे प्रगट केलेले सत्य मान्य केले. रोम ६:१७; १पेत्र१:२२ ही एक आवश्यक बाब आहे. याकोब १:२२-२५. येशू देवबापा प्रति आज्ञाधारक होत. वचन ८. विश्वासूंनीहि आज्ञा पालन करावी मग पौल त्यांच्या सोबत असो अथवा नसो; असेच आपण देखील करावे.

"काम करा" पौलाचे म्हणणे असे नाही की मुक्ति कार्याची आवश्यकता आहे. त्याला माहित होते की मनुष्याच्या प्रयत्नाने आणि चांगल्या कार्याने मुक्ति कमावता येत नाही. इफि २:८,९; रोम ३:२८; ४:४,५; ६:२३;११:६. त्याला असे म्हणायचे आहे की मुक्ति जे विश्वासूंचे जीवन आहे, ती त्यांच्या कार्याद्वारे दिसायला हवी. त्यांच्या जवळ येशू सारखा स्वभाव असावा. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी या गोष्टी लागू कराव्यात.

"भीत व कांपत" यशया ६६:२; यिर्मया ५:२२ हे काम महत्वाचे असून त्याचा अनंतकालिक परिणाम आहे. आदर, सन्मान, सतर्कता आणि समंजसपणाची आवश्यकता आहे. परमेश्वराच्या सन्मानासाठीचे वचन-उत्पत्ति २५:११; इयोब २०:२८; स्त्रोत ३४:११-१४; १११:१०; नीति १:७.

१३ तर गैरहजेरीतीह, भीत व कापत आपआपल्या मुक्तिचे कार्य करा. **कारण** तुमच्या आत त्यांची सुईच्छा व कार्य या
१४,१५ साठी प्रोत्साहहन देणारी शक्ति यहोवाचीच आहे. **वादविवाद** व कुरकुर न करता प्रत्येक काम करा. **यासाठी** की तुम्ही
या भ्रष्टव दुष्ट पिढीत जगाच्या स्वामीची निर्दोष व प्रामाणिक मुले असे व्हावे. व जीवनाच्या वचनाला धरून या जगात
१६ ज्योतिसारखे चमकावे. **तेव्हा** मी येशूच्या दिवशी आनंदित होणार या करता की मी व्यर्थ धावलो नाही किंवा व्यर्थ श्रम
१७ केले नाहीत. **होय**, येथपर्यंत जेव्हा मी पेयरूपी भेट म्हणून तुमच्या विश्वासाद्वारे उत्पन्न होणाऱ्या सेवेवर आणि
१८ बलिदानावर अर्पिला गेलो, तेव्हा मी तुम्हांसर्वांबरोबर आनंद करणार. **यास्तव** तुम्ही देखील आनंद माझ्याबरोबर मगन
१९ व्हावे. **परंतु** मी येशूवर आशा ठेवतो की तीमथ्याला तुमच्याकडे लवकर पाठवीन जेणेकरून तुमच्या संबंधीच्या गोष्टी
२०,२१ ऐकून मला शांति प्राप्त होईल. **कारण** तुमच्या संबंधी खरी काळजी करणारा माझ्याजवळ नाही. **या कारणाने** की प्रत्येक
२२ जण येशूच्या कामाविषयी नाही तर स्वत:च्या लाभाचा विचार करतो. **पण** जसा पुत्र पित्याशी वागतो तशी विश्वसनीय
२३ वागणूक त्याने शुभवर्तमानाच्या सेवेसाठी माझ्या बरोबर केली आहे, हे तुम्हाला माहितच आहे. **म्हणून** माझे काय
२४,२५ होणार हे कळताच मी त्याला लवकर पाठवणार. **परंतु** मला येथून भरंवसा आहे की मी लवकरच येईन. **मला** योग्य
२६ वाटले की एपफ्रदीत ज्याने माझी गरज भागवली, जो माझा बंधु, सखा, सैनिक आणि तुमचा संदेश वाहक आहे त्याला
२७ तुमच्याकडे पाठवावे. **त्याचे** मन व्याकुळ होते, तुम्हासर्वांना पाहण्याची त्याची कामना होती. खरोखर तो मरणारच
होता, परंतु स्वर्गिय पित्याने त्याच्यावर दया केली. केवळ त्यावरच नाही तर माझ्सावर देखील, यासाठी की मला

---

२:१३ ''यहोवा ज्यांची शक्ति तुमच्यात'' १:६; इफि २:१०पहा. परमेश्वर बाप लोकांच्या जीवनात बदल आणणात म्हणून आमची काहीच जबाबदारी नाही, असे म्हणणे खरे नाही. या विपरीत आपल्या आतील पित्याचे आत्मिक जीवन बाहेरून दाखवावे. आपण कठपुतली नाही. स्वर्गिय पिता आपल्या आत काम करत आहेत. बऱ्या उद्देश्याने ते आम्हाला पुढे नेत आहेत. आपण ख्रिस्तासारखे बनत जावे अशी त्यांची इच्छा आहे.(रोम ८:२९) या गंभीर कार्यात आपण सहकार्य करावे.

२:१४-१६ येथे दोन गंभीर अपराध आहेत- सृष्टिकर्त्या-विरूद्ध व पुढाऱ्यांविरूद्ध केलेली कुरकुर. (निर्गम १६:२-८; गणना ११:१ इत्यादि' एकामेकांशी तंटा( रोम १४:१-४; १करिंथ ३:३,४) या ऐवजी विश्वासूंना येशू प्रमाणे बनले पाहिजे. तेव्हा आम्ही ''निर्दोष गणले जाऊ'' (१ थेस्स २:१०; ५:२३; मत्तय १०:१६; २ करिंथ ११:२) आणि आमच्यात खोट राहणार नाही. (मत्तय ५:४६)

''भ्रष्ट पिढी'' मत्तय १७:१७; प्रेषित २:४०; गल १:४; इफि २:१-३; ४:१७-१९. प्रत्येक पिढी दुष्ट व कुजलेली आहे.

''ज्योति'' -मत्तय ५:१४-१६.

''जीवनाचे वचन'' जे विश्वास ठेवतात, त्यांना आत्मिक जीवन देण्यासाठी स्वर्गिय पिता आपले वचन देतात. (याकोब १:१८; १पेत्र१:२३.)

''व्यर्थ'' जर त्यांचे वागणे व व्यवहार जसा हवा तसा आहे तर जो मंडळी स्थापन करतो व शिकवतो त्याला येशूच्या दुसऱ्या आगमनात अभिमान करण्याची संधी मिळेल. गल ४:११; १थेस्स. २:१९,२० शी जुळवा.

२:१७,१८ ''पेय रूपी भेट'' निर्गम २९:४० पहा. कदाचित पौल मृत्यू आणि हिंसात्मक मृत्यूच्या शक्यतेची गोष्ट सांगतो आहे. (२तीमथ्य ४:६)

''विश्वास'' त्यांच्या ठायी असलेल्या येशूंच्या विश्वासाखातर पौलासाठी प्रेम-सेवा उत्पन्न झाली होती.(दुसऱ्यांसाठी सुद्धा) ४:१४-१६; २ करिंथ ८:१-४ हे एखादया बलिदाना सारखेच होते. पहा ४:१८; इब्री १३:१६. ख्रिस्ताच्या सेवेसाठी मरण प्राप्त झाले व परमेश्वरासाठी तो अर्पणची ''भेटवस्तु'' बनला तर, त्याला आनंद मिळणार होता. त्यांच्या सोबत असेच झाल्यास त्यांनीहि तसेच करावे.

२:१९ ''तीमथ्य'' १:१; १करिंथ ४:१७; १६:१०; १थेस्स ३:२.

२:२० ''समान विचार करणारा'' त्याच्या मनासारखा कोणीहि त्यावेळी तेथे नव्हता. तात्पर्य हेच की पौला सोबत तीमथ्य फिलिपैच्या कामात अगदी सुरवातीपासून होता. प्रेषित अध्याय १६.

२:२१ जगाची स्थिती अशीच आहे. अधिकांश ख्रिस्ती लोकांची देखील.

२:२२ ''पुत्र'' पौल तीमथ्याला आत्मिक गोष्टींत आपल पुत्र मानत होता. १ तीमथ्य १:२; तुलना करा. १ करिंथ ४:१४,१५; गल ४:१९; १ थेस्स २:११.

२:२३,२४ पहा १:२५,२६.

२:२५ ''भाऊ-बंधु'' आत्मिक गोष्टीत भाऊ किंवा सोबती विश्वासू.

''कामात माझा बंधु-सोबती'' -२ तीमथ्य २:३,४; इफि ६:११.

''माझ्या गरजा'' -४:१८ कद्चित एपफ्रदीतचे पैशाचे दान पौलापर्यंत आल्यानंतर वेगवेगळया प्रकारे तोच त्याची मदत करत राहिला.

''मरणोन्मुख'' असे वाटते की पौलाने बऱ्याच लोकांना बरे केले होते. (प्रेषित १९:११,१२; २८:८,९). त्याला ताबडतोब बरा करू शकला नव्हता. गल ४:१३; १तीमथ्य ५:२३. २ तीमथ्य ४:२० सुद्धा पहा. शेवटी पौल देखील बरा झाला होता. (''स्वर्गिय पित्याने दया केली'')

''दु:ख''- या पत्राचा मुख्य विषय आहे आनंद (१:४) परंतु कधीकधी या जगात विश्वासूच्या आनंदात, उदासीनता सुद्धा सामिल असते. २ करिंथ ६:१०; १पेत्र १:६.

२८ दु:खावर दु:ख होऊ नये. **म्हणून** मी त्याला मोठया तत्परतेने पाठवले की तुम्ही त्याला पुन्हा पाहिल्यावर आनंदित व्हावे
२९,३० आणि माझे दु:ख कमी व्हावे. **त्याला** येथून मोठया आनंदाने मान्य करा आणि अशांना आदर दया, **यासाठी** की
स्वत:च्या जीवची पर्वा न करना तो मृत्यू जवळ पोचला होता, जेणे करून माझी सेवा करण्यासाठी तुमची कमी भरून
**३** काढावी. **शेवटी** भाऊ-बहिणींनो, ख्रिस्तात सर्वदा आनंदित रहा. परत परत एकच गोष्ट लिहिण्यात मला काहीहि त्रास
२ होत नाही परंतु ते तुमच्याच लाभाचे आहे. **कुत्र्यांविषयी** सावध असा. वाईट कामें करणाऱ्यांपासून सावध रहा !
३ कापाकापी करणाऱ्यापासून सावध असा. **आपण** असे यहूदी आहोत जे आत्म्यापासून सृष्टिकर्त्याची उपासना करतात,
४ जे बाहेरच्या चालीरितीवंर भंरवसा ठेवत नाहीत. **तरी** मी बाहेरील रिती-विधींवर भंरवसा.आपल्या ठेवण्याचा बहाण
५ करू शकत होतो. **मी** आठव्या दिवशी सुंता झालेला होतो. इस्त्राएल वंशातील, बन्यामीन गोत्रातील, इब्रांचा इब्री आहे.
६ यहूदी धर्माच्या दृष्टीने एक परूशी.**उत्साही** म्हणाल तर मंडळीला छळणारा नियमशास्त्राच्या आधारे जर धार्मिकतेच्या

---

२:२८-३० जेव्हा पौल तुरूंगात होता एपफ्रेदीतास मंडळीने यासाठी पाठवले होते की त्याच्या द्वारे पौलाची मदत व्हावी. परंतु ख्रिस्ताच्या कामाच्या ओझ्याने तो आजारी झाला. यास्तव त्याने पुन्हा फिलिपैच्या मंडळीत परत जाण्याची इच्छा केली. तो त्याच्या कामात अयशस्वी झाला आणि पौलाच्या गरजेच्या वेळी तो त्याला सोडून चालला होता असा विचार फिलिपैच्या मंडळीने करणे शक्य होते. परंतु पौल त्यांना समजवण्याचा प्रयत्न करतो की तसे कांही नाही.

"आदर" वचन २९. या पृथ्वीवर दुसऱ्या लोकांच्या तुलनेत असे लोक अधिक आदरणीय आहेत. देवबाप सुद्धा अशा लोकांचा आदर करतील.-योहान १२:२६.

"आपल्या जीवनाची चिंता न करता" प्रेषित २०:२४;रोम १६:४; १ योहान ३:१६.

३:१ "आनंदित रहा" -१:४; ४:४. विश्वासूंनी आपले यश चांगली परिस्थिती व भरपूर संपन्नतेत आनंदित न होता येशूतच आनंदित व्हावे. हबक्कूक ३:१७,१८ पहा.

"एकच गोष्ट" कदाचित पौल आनंदित होण्यासाठी पुन्हा पुन्हा वापरल्या जाणाऱ्या शब्दांकडे इशारा करतो आहे; किंवा याच्या आधीच्या वचनात दुष्टांच्या प्रति दिल्या गेलेल्या सावधगिरीबद्दल. त्यापूर्वीही, कदाचित त्याने त्यांना सावध केले असावे.

३:२ इतर मंडळयांना सावध केल्यानंतर फिलिपैच्या मंडळीसहि पौलाने सावध केले. २ करिंथ ११:१३-१५; गल१:७;१:४; ५:१२; प्रेषित १५:१,२,५ देखील पहा.

"कुत्र्यांविषयी" यहूदी लोक कुत्र्यांना अशुद्ध समजत होते; तसेच यहूदी, नसलेल्यांना सुद्धा कुत्रा समजायचे. ज्या यहूदी लोकांनी येशूचा स्विकार केला नव्हता, जे ख्रिस्ती लोकांना संकटात घालत होते. पौलाच्या मते ते खरोखर अशुद्ध पशुच होते.

"वाईट काम करणारे" ख्रिस्ताच्या सुवार्तेला. नुकसान पोचवणे आणि ख्रिस्ती लोकांना सत्यतेपासून दूर नेणे ही सर्वात मोठी वाईट गोष्ट आहे कारण येथे तर अनंतकालाचा प्रश्न आहे.

"कापा-कापी" येथे सुंतेच्या विधीकडे तो इशारा करतो आहे. उत्पत्ति १७:१०-१४. काही यहूदी, यहूदी नसलेल्या ख्रिस्तीलोकांवर सुंतेची प्रथा अमलात आणण्यावर भर देत होते. येथे तो व्यंग-भाषा वापरतो, कारण जे अविश्वासू यहूदी सुवार्तेचा विरोध करत होते, ते सुंतेच्या खऱ्या अर्थाला आपल्या जीवनाद्वारे दाखवत नव्हते.(रोम २:२५-२९) म्हणूनच सुंता त्याच्या शरीराला एक पोकळ व अर्थहिन कापाकापी करण्यापेक्षा अधिक अर्थाचे नव्हते.

३:३ "आम्ही" अर्थातच येशूचा स्विकार करणारे, मग ते यहूदी असोत की नसोत जरी शारीरिक सुंता झालेली नसली तरी खरोखर तेच सुंता झालेले होते- म्हणजे जुणी सुंता विधी जी आंतरिक वास्तविकता सूचक होती, ती त्यांच्या जीवनात होती. पहा रोम २:२९; कलसै २:११ पौल येथे खऱ्या विश्वासूंची व्याख्या सांगत आहे.

"आत्म्याने सृष्टिकर्त्याची उपासना"- योहान ४:२३,२४.

"येशू ख्रिस्तात आनंदित" - १ करिंथ १:३०,३१.

"चालीरितीवरं भरंवसा नाही"-खोटे शिक्षक शिकवत असत की शरीरावर केलेली विधी, मानवीय प्रयत्न आणि चांगली कामे परमेश्वराला प्रसन्न करतात आणि मुक्ति प्राप्त करण्यात मदत करतात. या गोष्टीला पौल पूर्णपणे रद्द करतो. मानवीय स्वभावाची त्याला चांगली जाणीव होती. रोम ७:१८; ८:५-८. खरे ख्रिस्ती आपला विश्वास ख्रिस्तावर ठेवतात. त्यांचा विश्वास स्वत:वर, आपल्या कामांवर किंवा दूसरे त्यांच्यासाठी काय करतात यांवर नसतो. गल २:१६; ५:२४; इफि २:८,९.

३:४-७ यहूदी खोटे शिक्षक व धार्मिक कार्यांवर भरंवसा ठेवत असत. रोम २:१७:२०. पौल आपल्या मागील जीवनाविषयी सांगतो की मी धार्मिक कार्य करण्यात दुसऱ्यापेक्षा कमी नव्हतो म्हणजेच सर्वात जास्त होतो. या उलट, त्याने स्वत:वर आणि दुसऱ्यांवर भरंवसा ठेवणे सोडून दिले. पौल चांगल्या यहूदी लोकात असणाऱ्या सात गोष्टींचा उल्लेख करतो.

"आठव्या दिवशी" - लेवीय १२:३

"इस्त्राएल"-स्वर्गिय पित्याने निवडलेला देश रोम ९:४,५.

"बन्यामिन"-यहूदी लोक या गोत्रास फार आदर देत असत. यरूशलेम याच वंशाच्या क्षेत्रात होते.

"इब्रांचा इब्री" याचा अर्थ तो इब्री भाषेशी अवगत होता व त्यांच्या चालीरिती मानत होता.

"परूशी" - तो यहूदयांच्या कट्टरपंथी समूहाचा होता. (मत्तय ३:७ वरील टीप पहा)

"उत्साह" - जे त्याला खरे वाटत होते, त्या बद्दल तो उत्साही होता, आणि त्याच्या उलट असलेल्या शिकवणींचा त्याला द्वेष होता. (प्रेषित ८:३; ९:१,२) याच कारणाने यहूदी पुढारी त्याचा आदर करत होते.

७ दृष्टीने पाहिले तर निर्दोष ठरलेला. **जे** काही माझ्या लाभाचे होते, ख्रिस्तामुळे मी हानिच्या गोष्टी समजतो.
८ **त्याच्यासाठी** प्रत्येक प्रकारची हानि सहन केली, आणि सर्व वस्तूंना केरकचरा समजतो, जेणेकरून मी ख्रिस्तास प्राप्त
९ करावे, त्यात आढळावे. **नियमशास्त्राच्या** पालनाद्वारे मिळणरी योग्यता माझी स्वत:ची नव्हे, परंतु ख्रिस्ताद्वारे विश्वासामुळे
प्राप्त झालेली आहे, जी विश्वासाद्वारे यहोवा कडून मिळते यासाठी की मी त्यंच्या जिवंत होण्याच्या शक्तीत आणि
११ मृत्यूच्या समानतेत त्यांच्या दु:खात सहभागिता जाणावी. **यासाठी** की मेलेल्यांतून, जिवंत होण्याच्या अवस्थेपर्यंत ओळख
१२ करून दयावी. **असे** नाही की मी सर्व काही प्राप्त केले किंवा सिद्ध झालो. परंतु मी यासाठी पुढे जाऊ पाहतो की

---

''निर्दोष'' मोशे द्वारे दिलेल्या परमेश्वराच्या कोणत्याहि नियमांचे उल्लंघन न करणे हा त्याचा अभिप्राय होता. (दूसऱ्या ईश्वरांची पूजा त्याने केली नाही, मूर्ति मांडली नाही, चोरी किंवा व्यभिचार केला नाही.) बाहेरच्या सर्व नियमांचे त्याने पालन केले होते. स्वत:च्या जीवनात काहीहि वाईट त्याला दिसत नव्हते. नंतर मात्र त्याने जाणले होते की मनातच त्याने एक आज्ञा मोडली होती - रोम ७:७-११. कर्माद्वारे जर मुक्ति प्राप्त होऊ शकत होती, तर तो यांत सर्वात पुढे होता.

३:७ त्याचा हा नवा दृष्टिकोण दिमिष्काच्या मार्गावरील अनुभवांवर आधारित होता- प्रेषित ९:३-६. गोष्टींचे खरे महत्व काय आहे याचे ज्ञान त्याला प्राप्त झाले होते. ज्या गोष्टींना तो आत्मिक लाभाच्या मानत होता, त्याच आता हानिच्या झाल्या होत्या. स्वत:वर भरंवसा ठेवून गर्व केल्यामुळे तो ख्रिस्तापासून दूर होता. आता त्याने सर्व त्यागले होते. जन्म, वंश, धर्म, आणि यश यांचा गर्व -त्याचे आत्मिक डोळे उघडल्यावर त्याला हानिच्या वाटू लागल्या तो एक स्वार्थी मनुष्य होता. मात्र आता ते ख्रिस्त त्याच्यासाठी सर्व काही बनले हे, त्या सर्व लोकांच्यासाठी सत्य आहे ज्यांचे आत्मिक डोळे उघडले आणि ज्यांनी ख्रिस्ताला ओळखले आहे.

३:८ ''सर्व कांही'' - केवळ त्या गोष्टीच नव्हे ज्या विषयी तो वचन ४-६ यात सांगतो. त्याच्या जीवनाशी जुळलेले सर्व काही, धर्माद्वारे मिळणाऱ्या सर्व गोष्टी आता त्याच्यासाठी अर्थहिन झाल्या होत्या. तुलना करा. मत्तय १०:३९; १६:२४-२६. येशूला ओळखणे हे एक मोठे बक्षिस होते, ज्याच्या पुढे बाकी सर्व केरकचरा होते. योहान १७:३ आणि २ करिंथ ४:६ शी जुळवा. पौल येशू सोबत वैयक्तिक सहभागिते विषयी सांगतो. या समोर तो बाकीचे सगळे कचरा समजतो. खेद या गोष्टीचा आहे की ज्या गोष्टी पौलासाठी केरकचरा होत्या त्याच गोष्टींसाठी लोक जिवंत आहेत.

**''सर्व प्रकारची हानि''** लूक १४:३३ एखादया व्यक्तिने येशू ख्रिस्तास प्राप्त केले की त्याच्या साठी जगाचे सर्व अर्थहिन ठरत जाते. या करता त्याने दु:खी होऊ नये; सासाठी की ख्रिस्तात बुद्धि, धार्मिकता, पवित्रता, मुक्ति आणि प्रत्येक प्रकारचे आत्मिक आशीर्वाद आहेत. १ करिंथ १:३०; इफि १:३. एक खरा विश्वासू झाल्यावर काय किंमत मोजावी लागते? जे काही त्याच्याजवळ आहे. एक वास्तविक ख्रिस्ती बनल्यावर काय मिळते ? जे काही स्वर्गिय पित्याचे आहे. १ करिंथ ३:२१; रोम ८:१७; २करिंथ ६:१०; ८:९.

३:९ ''माझी स्वत:ची धार्मिकता''-वचन ६, रोम १०:३. याच धार्मिकतेसाठी लोक प्रयत्नशील असतात. परंतु न्यायाच्या वेळी सृष्टिकर्त्या समोर उभे राहतांना हे कोणत्याच फायदयाचे नाही. लूक १८:९-१४; यशया ६४:६ शी तुलना करा.

''विश्वासासाठी''-रोम ३:२१-२६,२८; ५:१; १०:१०; २करिंथ ५:११; गल २:१६.

३:१० ''यासाठी की मी.... सहभागिता जाणावी'' वचन ८ पौलाची इच्छा होती की त्याने ख्रिस्ताला अधिक उत्तमतेने ओळखावे तो अशा ज्ञानाबद्दल सांगतो जे व्यैयक्तिक अनुभवाने प्राप्त होते; त्या बौद्धिक ज्ञाना विषयी नाही जे वाचून मिळते. तुलना करा. २ पेत्र ३:१८.

''जिवंत होण्याची शक्ति''- पौल या शक्तिविषयी थोडे फार जाणत होता. हे बहुतांशी लोकांना असलेल्या ज्ञानापेक्षा अधिक आहे. (कलस्सै १:२९) परंतु यापेक्षाहि तो जास्त अनुभव प्राप्त करू पाहत होता. तुलना करा इफि १:१९,२०; ३:२०; रोम ६:६:४.

''त्यांच्या दु:खाची सहभागिता'' - १:२९; कलस्सै २:२४; रोम ८:१७. इतर लोकांपेक्षा अधिक दु:ख त्याने सहन केले होते. २करिंथ ११:२३-२९. तो त्यापेक्षाहि जास्त दु:खाची अपेक्षा करत होता. येशूच्या मंडळीत गाढ सहभागिता होण्यासाठी त्यांच्या दु:खात भागीदारी करणे गरजेचे आहे ते तो जाणत होता. त्यापासून पळवाट काढण्याचा प्रयत्न किंवा इच्छा तो करत नव्हता (जसे काही लोक समजतात) कलस्सै १:२४ पहा. आपल्या जीवनात पौलाने ख्रिस्तांना एकदा दु:ख दिले होते. प्रेषित ९:४,५. तो येशूंच्या क्लेशात भागीदार बनू इच्छित होता. ही भागीदारी तोपर्यंत आहे जो पर्यंत त्याचे लोग या जगात आहेत. येशूंच्या पुनरूत्थानात सहभागितेचा अर्थ त्यांच्या दु:खातहि शामिल होणे असा आहे. येशूंच्या त्रासात भाग घेणे असा आहे. (२ करिंथ १:५-७;योहान १६:३३) आणि या पृथ्वी नंतर जे काही त्यांचे आहे ते सुद्धा प्राप्त करणे होय. (रोम ८:१७) त्यांच्या मृत्युची समानता २:८ येशूच्या मृत्यूचा अर्थ, पूर्ण लीनता, आज्ञापालन, आणि यहोवाच्या इच्छेवर स्वत:ला सोडून देणे असा होता. हा अनुभव अधिकाधिक प्राप्त करण्याची पौलाची मनसा होती. २ करिंथ ४:१०-१२; गल २:२०.

३:११ ''मेलेल्यातून जिवंत होण्याची अवस्था''-याचा अर्थ काही जिवंत होतात, काही होत नाहीत. दूसऱ्या शब्दांत येथे तो विश्वासूंच्या जिवंत केल्या जाण्याबद्दल (१करिंथ १५:५०-५४;१थेस्स ४:१४-१७; प्रगटी २०:५) परंतु या पुनरूत्थानाला प्राप्त केले जाऊ शकते काय ? पौलाला याबद्दल काही शंका होती ? आपल्याला शंका करण्याचे काहीच कारण नाही की असे होते. ३:२१; १:६; रोम ५:८,९; ८:३८,३९; २ करिथ ५:१,२; २ तीमथ्य ४:१८. त्यास माहित होते की विश्वासूंचे जिवंत होणे ''विश्वास-जीवनाच्या'' शेवटी होते, या साठी येशूंची निवड करणे, निरंतर करत जाणे, शेवटपर्यंत विश्वास ठेवणे आवश्यक ठरते. कलस्सै १:२३; इब्री ३:६,१४. त्याच्या जीवनाची दिश, येशूच्या ज्ञानात व सहभागितेत वाढत जाण्याने, त्यांच्या सारखे होत जाण्याचे, निश्चित झाली. याच प्रकारच्या विश्वासात अढळ राहणे हा इब्रीकरांस पत्राचा एक मोठा विषय आहे. (हा बायबल चा एक मोठा विषय होय).

३:१२ ''मी सर्व काही प्राप्त केले असे नाही'' वचन १०, तो येशूंच्या सहभागितेविषयी व सामर्थ्याविषयी काही जाणत होता. परंतु त्यांचा पूर्ण अनुभव प्राप्त करणे शक्य नव्हते.

१३ ख्रिस्ताने मला ज्याकरता निवडले ते सर्व मी प्राप्त करावे. **बंधुनो-बहिणींनो**, मला असे वाटत नाही की मी या सर्व
गोष्टी प्राप्त केल्या आहेत. पण एक काम मी करतो; जुण्या गोष्टी विसरून पुढच्या गोष्टींकडे वाटचाल करत आहे.
१४,१५ **मी** येशू ख्रिस्तात स्वर्गिय पित्याच्या स्वर्गिय पाचारणाच्या बक्षिसासाठी खुणेकडे धावत जात आहे. **यासाठी** आपल्यात जे
समंजस आहेत त्यांचे चित्त असेच असावे. जर एखादया गोष्टीत तुमचा विचार वेगळा असेल तर देवबाप ते तुम्हांवर
प्रगट करतील. कोणत्याहि परिस्थितित, ज्या मापाने आम्हाला मिळाले, त्याच नियमानुसार आम्ही जीवन जगावे आणि
एक मन असावे. बंधुनों-भगिनींनो आम्ही तुमच्यासाठी एक नमूना आहोत, म्हणून दुसऱ्यांशी मिळून माझ्या सारखे
१८ जीवन कंठा आणि त्यांच्याकडे सुद्धा लक्ष ठेवा जे असे करतात. **पुष्कळ** लोक येशूच्या क्रूसाच्या वैऱ्यांसारखे वागतात.
१९ नेहमी मी अशाबद्दल तुम्हाला सांगितले आहे; आणि आता ही रडत सांगतो. **त्यांच्या** अंत विनाश आहे. त्यांचे पोट
त्यांचा ईश्वर आहे, स्वत:च्या निर्लज्जतेवर त्यांना गर्व आहे. त्यांचे पूर्ण लक्ष पृथ्वीवरच्या गोष्टींकडे लागलेले आहे.

---

"सिद्ध"-हे त्याचे लक्ष्य होते, पण तेव्हा पर्यंतही त्याला अनुभव झालेला नव्हता. मत्तय ५:४८ यात "सिद्ध" यावरचे नोट्स पहा. कदाचित फिलिपैत काही असे लोक होते, जे कोणत्या ना कोणत्या प्रकारे सिद्ध होण्याचा प्रयत्न करत होते आणि दूसऱ्यांना तुच्छ समजत होते. (पौलाच्या पत्रांत तेथील लोकांच्या आत्मिक आवश्यकतांचा उल्लेख असायचा) जर तेथे सिद्धते बद्दल सांगणारे लोक होते तर तशांना पौल सांगतो की आतापर्यंत तोच सिद्ध नाही) जर महानप्रेषित पौलच सिद्ध बनू शकला नव्हता, तर आपण जाणून घ्यावे की आपणही तसे झालेलो नाही.

"पुढे जातो"- इब्री ६:१,११,१२.

"प्राप्त करू शकावी" येशूने त्याला जे होण्यासाठी पाचारण केले होते ते होण्याची पौलाची इच्छा होती. जितके एखादया विश्वासूला या पृथ्वीवर शक्य होते, तितके पवित्र, लीन, आज्ञाधारक, प्रेमी आणि फळ देणारा बनू पहात होता.

३:१३ "एक काम करतो" त्याचे हृदय विभागलेले नव्हते त्याचे मन आत्मिक गोष्टी विषयी दोन विचारांचे नव्हते. (याकोब १:८ शी तुलना करा.)

"विसरून" याचा अर्थ, स्मृतीतून एकदम काढून देणे हा नव्हे. तसे क्वचितच आपण करू शकतो. पौल म्हणतो की तो मुद्दामच जुण्या गोष्टी विसरत जातो. त्याच्याकरता पुढे येणाऱ्या गोष्टी जास्त आवश्यक होत्य. जुणे यश-अपयश सोडून तो पुढे जाऊ इच्छित होता. जुण्या अपयशांनी त्याला निराश करावे व यशाने त्याला आळशी बनवावे, अशी त्याची इच्छा नव्हती.

"पुढे....... जात आहे" या श्ब्दांद्वारे हेच प्रगट होते की धावक जसा प्रयत्न व परिश्रम करतो तसेच प्रयत्न व परिश्रम करणे.

३:१४ "खुणे कडे" १ करिंथ ९:२४-२७; प्रेषित २०:२४ पहा.

"बक्षीस" बक्षीस काय आहे या बद्दल तो सांगत नाही. त्याला ठाऊक आहे की जितके मोठे बक्षीस सृष्टिकर्ता बनवू शकतात तितके मोठे एक बक्षीस असणार.

बक्षीस (पुरस्कार) विषयी मत्तय ५:१२; १०:४१,४२; १६:२६; १करिंथ ३:८,१४; इब्री १०:२५; प्रगटी ११:१८; २२:१२ पहा.

"खुणे कडे धावत जातो" - वचन २०; इब्री ३:१.

३:१६ "समंजस किंवा सिद्ध" -१ करिंथ २:६; इफि १:१३-१५; कलस्सै १:२८; ४:१२. इब्री ५:१४; ६:१. पौलाच्या मते, निर्दोष किंवा खोट नसलेले म्हणजे सिद्ध असे नव्हते. वचन १२. परंतु त्याला माहित होते की तो एक समंजस विश्वासू होता. ख्रिस्तात आत्मिकतेने वाढलेला होता. सिद्धतेविषयी पौलाचे जे विचार होते तेच ख्रिस्ताच्या शिष्यांचे देखील असावेत. पौलाला माहित होते की वरील वचनातील "सिद्धते" विषयीची शिकवण स्वर्गिय पित्याकडून येणारे ज्ञान होते आणि त्याद्वारे सत्य जाणण्यासाठी परमेश्वराने त्यांचे डोळे उघडावे अशी पौलाची इच्छा होती.(१:९,१०) त्याला ठाऊक होते की त्याची विनंती ऐकली जाईल. याच ज्ञानरूपी पायावर शिष्यांनी जीवन जगावे. त्यांनी असे केले तर सत्यतेची जाणीव करून देण्यासाठी सर्व शक्तिमान प्रभु त्यांना समज देतील.

३:१७ "नमूना"-प्रेषित २०:१८ चे नोट्स आणि संदर्भ पहा. पौलाने केवळ त्याबद्दल सांगितलेच नाही परंतु प्रत्यक्ष तशी वागणूक दर्शविली.

"लक्ष ठेवा"- वचन २; रोम १६:१७.

"रडत" - प्रेषित २०:३१. पौल रडत असे. कारण जे ठामपणे म्हणत होते की त्यांचा विश्वास ख्रिस्तात आहे, तेच लोक प्रत्यक्ष आपल्या कर्मांनी सिद्ध करत होते की ते ख्रिस्ताचे वैरी आहेत. असे वाटते की स्थानीय मंडळीची स्थापना होताच वधस्तंभाचे वैरी लवकरच उघडकीस येत असत. प्रेषित २०:२९,३०; रोम १६:१७; २ करिंथ ११:१३-१५; गलती १:७; ६:१२; कलस्सै २:८, १६; २तीमथ्य ३:१-७; ४:१-५. हे लोक धार्मिकतेचा आव आणत होते परंतु त्यांच्या सामर्थ्याला नकार देत होते. १ तीमथ्य ३:५.

३:१९ "विनाश" मत्तय ७:१३; योहान १७:१२; रोम ९:२२; २ थेस्स १:९.

"पोट" येथे वापरलेला शब्द कदाचित शरीर (देहाचे ते जीवन जे आत्मिक जीवनाच्या अगदी उलट आहे) रोम ७:५. काही लोक याच ईश्वराची (दैहिक इच्छेवर चालणे) उपासना करतात. ते खोटे बोलणे, धोका देणे, आणि चोरी करण्यात मागे नाहीत. स्वत:ला येशूचे शिष्य म्हणवतात परंतु आपल्या अभिलाषेनुसार जीवन जगतात - रोम १६:१८; १तीमथ्य ६:५; २पेत्र २:३. ते नेहमी पोट भरू इच्छितात. परमेश्वराच्या आत्म्याच्या विपुलतेशी त्यांचे काहीच देणे-घेणे नसते.

"निर्लज्जपणा" आपल्या भयंकर आत्मिक अज्ञानतेमुळे ज्या गोष्टी निर्लज्जपणाच्या आहेत त्यांचा ते गर्व करतात. तुलना करा १ करींथ ५:१,२,६, २ पेत्र २:१८ यहूदा १६; स्तोत्र १०:३; ५२:१. ज्या सन्मानास पौल केर समजतो त्याच त्यांच्या जवळ आहेत.

"पृथ्वीवरच्या गोष्टी" - रोम ८:५-८ आत्मिक गोष्टींची लालसा त्यांच्यात नाही, फक्त जगिक गोष्टींसाठी आहे. त्यावर ते वाटेल

२०,२१ **परंतु** आमचे नागरिकत्व स्वर्गाचे आहे. तेथूनच प्रभु येशू ख्रिस्ताच्या आगमनाची प्रतिक्षा आहे. **ते** आमच्या क्षणभंगुर
शरीरास बदलून टाकतील. यासाठी की त्यांच्या तेजोमय शरीरासारखे आमचे ही शरीर व्हावे. ज्या शक्तिने सर्व
४ वस्तुंना ते आपल्या नियंत्रणात घेण्यास समर्थ आहेत त्याच शक्तिने येशू असे करतील. **म्हणून** प्रियजनहो तुमच्यात
माझा २जीव आहे, तुम्ही माझा आनंद व मुकुट आहात,त्या माझ्या प्रिय भाऊ-बहिणींना, प्रभुमध्ये स्थिर राहा. **मी** युवदीयेला
३ आणि सुंतुखेला विनंती करतो की त्यांनी प्रभु मध्ये एकचित्त व्हावे. **माझ्या** खऱ्या सोबती मी तुला विनंती करतो की
ज्या स्त्रियांनी शुभवर्तमानाच्या कार्यात माझ्या बरोबर परिश्रम केले, त्यांना मदत करा. ज्याप्रमाणे क्लेमेंत आणि दुसऱ्या
४ कार्यकर्त्यांनी, ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात आहेत, परिश्रम केले, त्यांना साहाय्य करा. **येशूत** सर्वदा आनंद करा,
५,६ मी पुन्हा सांगतो, आनंदित असा. **तुमची** सज्जनता सर्व लोकांनी पहावी. येशू अचानक येतील. **कशाविषयीहि** चिंता करू
७ नका, परंतु प्रत्येक परिस्थितित तुमच्या विनंत्या उपकारस्तुतिसह स्वर्गिय पित्या समोर आणल्या जाण्यात. **तेव्हा**

---

तितके बोलतात किंवा संदेश देतात. धन, संपत्ति, आदर, यश. आणि दैहिक इच्छाची पूर्ति होणे यांच्यातच त्यांना गोडी वाटते आणि ते यांच्याच मागे आहेत.

३:२० येशूचे विश्वासू या जगात असूनहि या जगाचे नाहीत. योहान १७:६,११,१४,१५. त्याचे शहर आणि देश वर आहे - इब्री ११:१०,१६; १३:१४; गल ४:२६. ते स्वर्गाचे आहेत. त्यांच्या इच्छा व आशा त्यावरच टेकलेल्या आहेत. यहोवा त्यांचे राजे आहेत. विश्वासू आपल्या तारकाच्या येण्याची वाट पहात आहेत-प्रेषित १:११; १ थेस्स ४:१४-१८. इब्री ९:२८.

३:२१ "बदलून टाकतील" १ करिंथ १५:५०-५३.
"तेजोमय शरीर" -१ करिंथ १५:४२-४४,४९; १योहान ३:२; रोम ८:२३-२५.
"समर्थ" - १करिंथ १५:२४,२५; इब्री २:४; इफिस १:९.

४:१ "जीव आहे" - १:७,८.
"आनंद आणि मुकुट"- २:१६; १थेस्स २:१९. त्यावेळी ते लोक, पौलाचा आनंद बनले होते; त्यानंतर मात्र ते आनंद आणि मुकुट झालेत.
"स्थिर असा"-इफि ६:११,१३,१४ इत्यादि.

४:२ आपणास माहित नाही की या दोन स्त्रियाँ कोण होत्या, परंतु त्यांच्या भांडणामुळे पौल विचलित झाला होता. त्याने विनंती केली की तंटा बंद करा. तुलना करा:२:१२. भांडणामुळे शिष्यांत किती कुप्रसिद्धी होईल याची कल्पना पौलाला होती. १करिंथ १:१०-१३; ३:३,४.

४:३ "खरे सोबती"- कोणाबद्दल म्हटले आहे हे माहित नाही. असे वाटते की पौलाने त्यावर भरंवसा केला, की तो भांडण मिटवू शकेल.
"जीवनाचे पुस्तक"- निर्मम ३२:३२; स्तोत्र ६९:२८; १३९:१६; लूक १०:२०; प्रगटी ३:५; २०:१२-१५ पौलाला कसे माहित होते की त्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहीलेली आहेत. त्यांची कार्ये पाहून व त्यांच्या विषयी ऐकून १ थेस्स १:४-१० शी जुळवा.

४:४ ३:१ आणि नहे ८:१० पहा.

४:५ "सज्जनता" -२ करिंथ १०:१; १ तीमथ्य ३:३; याकोब ३:१७.
"येशू अचानक येतील" याचा अर्थ असा होऊ शकतो की तो सध्या विश्वासूंच्या जवळ आहे. (स्तोत्र १४५:१८; मत्त्य २८:२०; इब्री १३:५)

४:६ येथे आपल्यासाठी स्वर्गिय बापाचा मार्ग आहे. जीवनाच्या सर्व परिस्थितित, मनातील शांति. (येशूच्या विरूद्ध गेल्याने शांतिचा लोप होतो)
"चिंता" यावरून स्पष्ट होते की त्यांचा यहोवा वरील भरंवसा आणि सत्यते विषयीची समज कच्ची आहे. चिंता आणि विश्वास, तेल व पाण्यासारखे आहेत. ते कधीही एकजीव होत नाहीत मत्तय ६:२५-३४ पहा.
"कशाविषयी हि" अत्यंत कठीण व हादरून टाकणाऱ्या परिस्थितितही आपण चिंतीत होता कामा नये. आपण जर येशूचे शिष्य आहोत तर यहोवा. आमच्या आत आहे. जवळ आहे, चारी बाजूंना आहे. आमच्या समजणुकीतहि आहे ते आमचे बाप आहेत, ते आम्हावर आमच्या योग्यतेपेक्षाहि अधिक प्रेम करणारे आहेत. आमच्यासाठी ते असिमित शक्तिचा वापर करतात. आपल्या चिंता त्यांच्यावर पूर्ण भरंवसा ठेवून टाकून दयाव्यात आणि त्यांच्या प्रतिज्ञेवर विसंबून राहणे हीच आमची जबाबदारी आहे. १ पेत्र ५:८ पौल काही प्रार्थनांविषयी येथे सांगतो.
"उपकारस्तुतिसह" उत्पत्ति १८:३२. लेवीय ७:१२,१३ स्तोत्र ७:१७; ५०:१४,१५; इफिस ६:१८; १थेस्स ५:१७,१८; इब्री १३:१५-आपण अशी कल्पना करू शकतो का, की उपकारस्तुति न केल्यास आपल्या दुसऱ्या प्रार्थना यशस्वी होतील. उपकारस्तुतिच्या अभावी आपल्या अंत:करणात चिंता येत नाहीत काय ?
"विनंती ...... स्वर्गिय बापा समोर" - लोकांसमोर नाही. पहा मत्तय ७:११.

४:७ परमेश्वराची शांति म्हणजे जी शांति परमेश्वर देतात ती होय. ही शांति त्यांच्या शक्ति सारखीच आहे. यहोवा कोणत्याच विषयासाठी चिंतीत होत नाहीत. जेव्हा आपण यहोवाला आपले जीवन देतो, विश्वास ठेवतो तेव्हा आपल्या जीवनात शांति निर्माण होते. यशया २६:३; योहान १४:१,२७; १६:३३; कलस्सै ३:१५. ही शांति त्या विश्रांती प्रमाणे आहे ज्याची प्रतिज्ञा मत्तय ११:२८-३० यात केली गेली आहे. येशूच्या लोकांना अशा परिस्थितित शांति प्राप्त होऊ शकते जी दुसऱ्यांना कधीहि मिळू शकत नाही. ही शांति कशी प्राप्त होईल त्यांना माहित नाही पण ती प्राप्त करून ते आश्चर्यचकित होतील. त्यांच्या मनातील व

८ स्वर्गिय पित्याची शांति जी बुद्धीच्यापलीकडे आहे, तुमचे हृदय व मन ख्रिस्त येशूत राखेल. **शेवटी** भाऊ-बहिणींनो, जे
काही सत्य आहे, ज्या गोष्टीत प्रामाणिकपणा आहे, न्याय आहे, ज्या गोष्टी शुद्ध, प्रिय आणि ऐकण्यास उत्तम आहेत
९ त्यांवर लक्ष दया. जर एखादी चांगली व प्रशंसनीय गोष्ट असेल तर त्यावर मनन करा. **जे** काही तुम्ही माझ्यापासून
१० शिकलात, स्विकारले, ऐकले व माझ्यात पाहिले, त्याच करा आणि शांतिचे परमेश्वर तुम्हां सोबत राहतील. **मी**
११ येशून आनंदित आहे यासाठी की तुम्ही पुन्हा एकदा माझ्याबद्दल काळजी करत आहात. यापूर्वी तुम्ही माझी-काळजी
१२ करत तर होता पण तुम्हाला संधि मिळाली नव्हती. **असे** नाही की मी आपल्या गरजांविषयी तुम्हाला सांगतो पण मी
१२ हे शिकलो आहे की ज्या परिस्थितित मी आहे त्यात समाधानी राहावे. **अभाव** असो किंवा भरपूरी, दोन्ही अनुभव
माझ्याजवळ आहेत. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक गोष्टीने मला शिकवले आहे की मी तृप्त कसे राहावे किंवा भूक कशी
१३ सहन करावी. संपन्नतेचा आनंद कसा घ्यावा किंवा गरज भागली नाही तर त्यांची पीडा कशी सहन करावी. **येशू** मला
१४ जी शक्ति देतात, त्याच्या मदतीने मी सर्व काही करू शकतो. **मग** मी यात आनंद मानतो की तुम्ही माझ्या संकटात
१५ माझे भागीदार झालात. **तुम्ही** फिलिपैच्या मंडळीचे लोक, तुम्हांस ठाऊक आहे की शुभवर्तमानाच्या सुरवातीला जेव्हा
१६ मी मासेदोनिया सोडणार होतो, देण्या-घेण्याविषयी तुम्हाला सोडून इतर कोणीहि माझी मदत केली नव्हती. **जेव्हा** मी
१७ थेस्सलनीकेत होतो, तेव्हा वारंवार तुम्ही माझ्या गरजा पूर्ण केल्या होत्या. **मी** यासाठी सांगत नाही की मी बक्षिसाचा
१८ भुकेला आहे. मला असे वाटते की तुमच्या खात्यात अधिक जमेची-बाजू वाढावी. **माझ्याजवळ** सर्व काही विपुल प्रमाणात
आहे. एफ्रदीताच्या हाती जे काही तुम्ही पाठवले ते मिळाल्यामुळे मला भरपूर झाले आहे. ते जणु काय सुगंधित द्रव्य,

---

विचारांतील दारांवर ही शांति एखादया सुरक्षा कर्मचाऱ्यांसारखी असते. तेव्हाच आपले हृदय प्रत्येक प्रकारच्या चिंतेपासून मुक्त राहू शकेल.

४:८ ''त्यावर मनन करा''-आपले आत्मिक जीवन व आपली बुद्धी आणि विचारशक्ति यांत मोठा संबंध आहे. त्यावरच आपली कामे अवलंबून असतातत. त्यांचे निरंतर नवीनीकरण आवश्यक आहे. रोम १२:२. त्यांचे लक्ष स्वर्गिय गोष्टींकडे असावे. पहा स्तोत्र १:१,२. वाईट गोष्टी, जगिक गोष्टी आपल्या वाईट स्वभावाला आकर्षित करतात. गल ५:१६,१७. या गोष्टींचा विचार केला तर त्याच गोष्टी करण्याची आपली इच्छा होईल. जर आपले विचार सत्य पवित्र आणि चांगल्या बाबींवर टिकून राहिले तर, वाईट इच्छा मोठया सहज रितीने आपल्याला रद्द करता येतील. आपण सावध असावे की काय वाचतो, काय पाहतो, कसे संगीत ऐकतो, कशा कल्पना करतो; या गोष्टी येशूच्या लोकांसाठी नाहीत, तेव्हा याचा परिणाम प्रभाव आपल्या वागणुकीवर व कामावर होईल.

''शांतिचा परमेश्वर''- रोम १५:३३; १६:२०; १थेस्स ५:२३; इब्री १३:२० जर आम्हांजवळ शांतिचे परमेश्वर आहेत तरच आपण परमेश्वरीय शांति प्राप्त करू शकतो. वचन १७.

४:१० ''आनंदित''-१:४,५ स्वत:ला काही मिळाले म्हणून तो आनंद करत नाही. त्याला मिळालेला आनंद हा स्वर्गिय पित्याकडून प्राप्त झालेला उपहार होता. वचन १७. जे काही आपण लोकांद्वारे प्राप्त करतो त्या प्रति आपला व्यवहार असाच असावा.

४:११-१२ १ तीमथ्य ६:६-८; इब्री१३:५; लूक ३:१४. या पृथ्वीवर खरोखरचा श्रीमंत कोण आहे? तोच जो स्वत: जवळ असलेल्या गोष्टींतचं आनंदित असतो. पौल, समाधानी असणे शिकला होता. तसा त्याचा स्वभाव नव्हता. देवाच्या शांतिसोबतच समाधानहि असते. ही शांति विश्वासूंच्या मनाला सुरक्षा देते. त्या परिस्थिती व घटना ज्यात पौल समाधानी असणे शिकला होता त्या २ करिंथ ४:८,९; ६:४-१० आणि ११:२३-२७ यात आपण पाहू शकतो. हे पत्र त्याने एखादया राजमहालातून किंवा तुरूंगातून लिहिले नाही. १:१२,१३. काही ख्रिस्ती लोकांच्या मनात धन, संपत्ति, वैभव प्राप्त करण्याच्या इच्छा आहेत, पण हे वचनाच्या विरोधात आहे आणि आमच्या आंतरिक नवजीवना करता धोक्याचे आहे.

४:१३ ''सर्व काही''- त्याचा अनुभव आहे की, कोणत्याहि परिस्थितित, कामाचा आणि आहवानाचा सामना तो यशस्वीपणे करू शकत होता.

''त्यांच्या (येशू)मदतीने'' - रोम ८:३७;२करिंथ २:१४; ३:४-६. इफि १:१९; ३:२०. पौलाचा भरंवसा त्याच्या शक्तिवर आत्मसंयमावर किंवा शिस्तीवर अवलंबून नव्हता. (जरी या सर्वांचा त्याला अभ्यास होता-१ करिंथ ९:२५-२७)

''शक्ति देतात'' - स्तोत्र ७३:२६; यशया ४०:३१; २ करिंथ १२:८-१० पौल जे काही शिकला होता ते प्रत्येक विश्वासूने शिकावे. 'माझ्याद्वारे काहीच होणार नाही असा विचार विश्वासू लोकांनी सोडून दयावा.

४:१४-१६ पहा १:५ देण्याच्या दृष्टीने ही एक नमूनेदार मंडळी होती. २ करिंथ ८:१-५ सुद्धा पहा.

''थेस्सलनिका'' प्रेषित १७:१.

४:१७ वचन १०

४:१८ ''सुगंधित''-योहान १२:३; मत्तय २६:१०; लेवीय १:९; २:२ यांशी तुलना करा.

''बलिदान''-२:१७; इब्री १३:१६.

४:१९ त्यांनी पौलाच्या गरजा भागवल्या होत्या. वचन १८. त्यांच्या दैन्यावस्थेतून त्यांनी हे कार्य केले होते. २ करिंथ ८:२ स्वर्गिय बाप

१९ स्वर्गिय पित्याला मान्य, संतोषकारक बलिदाना सारखेच आहे. **माझे** स्वर्गिय पिता तुमची सर्व गरज येशू ख्रिस्तात
२० आपल्या गौरवाद्वारे पुरवतील. **आता** आमच्या यहोवा बापाचा गौरव असो. आणि त्याला आदर युगानुयुग असो. असेच
२१,२२ अवश्य होवो. **ख्रिस्ताच्या** प्रत्येक पवित्र जनाला सलाम, माझ्यासोबतचे सर्व भाऊ यात सामिल आहेत. **सर्व** पवित्र लोक
२३ विशेषकरून कैसराच्या घरचे तुम्हाला सलाम सांगतात. **स्वामी** येशू ची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असते. असेच होवो.

---

आपल्या विपुलतेच्या खजिन्यातून त्यांच्या गरजा भागवणार होते. येथे एक सूत्र किंवा सिद्धांत आहे ज्याचा अभ्यास आपण सर्वांनी करावा. पहा लूक ६:३८; २करिंथ ९:६-८.

''तुमच्या गरजा'' जे काही आपल्याला हवे ते. मत्तय ६:३३; ७:९-११. स्तोत्र २३:१; ३६:२५. यहोवा आपल्या आत्मिक गरजा देखील भागवतात. वचन २३; इफि १:३; ३:१६-२०.

''धन-संपत्ति''- रोम २:४; ९:२३; इफि १:१७,१८; २:७; ३:८,१६. स्वर्गिय बाप आपल्या गरजा पूर्ण करू शकेल की नाही? या विचाराने ख्रिस्ताच्या विश्वासूंनी अस्वस्थ व्हावे का ? मुळीच नाही. वचन ६. मत्तय ९:२९. जर लोकांकडून मदतीचा हाथ आवश्यक वाटत असेल तर सृष्टिकर्ता स्वत: ते काम करू शकतात. ते लोकांच्या मनात प्रेरणा देतील की त्यांनी विश्वासूंची मदत करावी. महत्वाची गोष्ट ही आहे की आपण सर्व काही त्यांच्या ताब्यात दयावे व त्यांच्याकडे सोपवून टाकावे.

'प्रभु काही करू शकत नाही' ही कल्पनाच आपण करू नये. किंवा तो करणाार नाही अशी आपली कल्पना नसावी. गणना ११:२३ पहा.

४:२० रोम १६:२७ इत्यादि.

४:२१ ''संत''- रोम १:७.

४:२२ ''कैसराच्या घरचे सर्व'' - १:१३. कदाचित तो राजघराण्यातील किंवा सरकारी सेवारत लोकांकडे इशारा करत आहे.
''विना अट कृपा''- रोम १:७; १६:२० याच प्रकारे आपल्या गरजा भागवल्या जातात.